अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# चुकीच्या शब्दांमुळे राजकारणी मुद्द्यांवरून गुद्द्यांवर

राजकारणात कोणत्यावेळी कोणत्या मुद्द्याला किंवा अगदी एखाद्या साध्या शब्दालाही महत्त्व प्राप्त होईल, हे काहीच सांगता येत नाही. लोकसभा आणि महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक जसजशी जवळ येत जाईल तसतसे असे मुद्दे आणि शाब्दिक गुद्द्यांची लढाई वाढत जाईल. अशा शब्दांबाबत आणि मुद्द्यांबाबत राजकारण्यांनी केलेला शब्दच्छल थोडा विचार करायला लावणारा आणि बरेच मनोरंजन करणारा असतो. हे राजकीय पक्ष एकमेकांवर टीका करताना आरोप करताना असे शब्द किंवा मुद्दे उपस्थित करतात. त्यावर जेव्हा अनेकवेळा जनतेपर्यंत चर्चा सुरू होते तेव्हा त्या त्या पक्षाच्या नेत्यांची विचार करण्याची पध्दत कशी आहे हेही लोकांसमोर येते. दुर्दैवाने आपल्या देशात जेवढे महत्त्व राजकारणाला आहे तेवढे महत्त्व चांगल्या कामांना चांगल्या विचारांना मिळत नाही. परंतु या 'उदंड जाहले राजकारण' वृत्तीमुळे मूळ प्रश्नांना आणि मूलभूत समस्यांना आपोआपच बगल दिली जाते. बऱ्याच वेळा एका चांगल्या उद्देशाचा, कल्पनेचा, विचारांचा, ध्येयाचा अक्षरश: चुथडा होतो. खरेतर चुथडा हाच शब्द वापरावा लागला. कारण इतक्या भावनाशून्यतेने, संवेदनहीनतेने त्या शब्दांचा वापर केला जातो. अर्थात राजकारण्यांकडून शब्द संयमाबाबत फारशा अपेक्षा ठेवणे योग्यही नाही. परंतु एक मात्र खरे काही चांगल्या शब्दांना राजकारण्यांमुळे बदनाम व्हावे लागते. तर काही अयोग्य किंवा वाईट अर्थाच्या शब्दांना राजकारण्यांमुळे वेगळीच प्रतिष्ठा प्राप्त होते. गेल्या काही दिवसांत चर्चेत आलेल्या काही अशा शब्दांकडे नजर टाकली तर हे सहज लक्षात येते. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात शिवबंधन आणि गंडा या शब्दांवरून चर्चा झाली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसैनिकांच्या हातावर धागा बांधून शिवबंधन केले गेले. महाराष्ट्रात विधानभवनावर भगवा फडकवण्याची प्रतिज्ञा शिवसैनिकांनी घ्यावी म्हणून हा कार्यक्रम आयोजित केला गेला. या शिवबंधनावर शरद पवारांनी नेहमीच्या पध्दतीने मल्लिनाथी केली असे गंडे बांधून सत्ता मिळत नाही आणि गंडे दोरे बांधणे आता अंधश्रध्दा निर्मूलन कायद्यानुसार गुन्हा ठरतो. असे बोलायलाही पवारांनी मागेपुढे पाहिले नाही. त्याला टोला हाणताना उध्दव ठाकरेंनी पवारांना बंधन या शब्दाचा अर्थ कधीही कळणार नाही. एवढी वर्षे अनेकांना गंडवण्यात ज्यांचे दिवस गेले त्या पवारांना गंडाच आठवणार. आता बंधन आणि गंडा हा शब्द दोन राजकारणी आपापल्या पध्दतीने कसा वापरतात यानिमित्ताने दिसून आले. परंतु एखादी गोष्ट करण्यासाठी हातावर धागा बांधून प्रतिज्ञाबध्द होण्याची फार मोठी परंपरा भारतीय संस्कृतीत आहे. बंधन या शब्दाला एका पावित्र्याची किंवा शुभसंकल्पाची किनार आहे.

## भावनाही महत्त्वाच्या

शब्दाच्या अर्थापेक्षा त्यामागे असलेल्या भावना समजून घेण्यासाठी तितकेच संवेदनाक्षम मन लागते. ते पवारांकडे नाही हे त्यांच्या या टीकेवरून दिसून येते. अन्यथा बाळासाहेबांच्या जयंतीदिनाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी योग्य शब्दांचा वापर आणि त्यामागच्या भावनांचा आदर केला असता. शिवबंधन उपक्रमाला त्यांनी गंडाबंधन ठरवून औचित्य आणि औदार्य याचेही भान ठेवले नाही. बंधन या शब्दातून व्यक्त होणारे भावबंधन पवारांना माहीत नसावे किंवा माहीत असूनही मान्य नसावे. म्हणजे राजकारणामुळे बंधन या चांगल्या शब्दाला अनाठायी बदनाम व्हावे लागले आणि फारसे महत्त्व नसलेला किंवा सहसा वापरात नसलेल्या गंडा शब्दाचा प्रचार सहजपणे होऊन गेला. असाच प्रकार शहजादे या शब्दाबाबत अजूनही सुरू आहे. भारतीय जनता पार्टीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांनी अनेक जाहीर सभांमधून राहुल गांधींचा 'शहजादे' असा शब्द वापरून उल्लेख केला. त्याला उत्तर देताना काँग्रेसने मोदींचा 'सौदागर' म्हणून उल्लेख केला. आता तर मोदींची चहावाला म्हणून ओळख करून दिली जात आहे. 'शहजादे' हा एकतर ऊर्दू धाटणीचा शब्द आहे. त्यावरून श्रीमंताघरचा लाडका पुत्र किंवा राजपुत्र म्हणून अर्थ स्वाभाविकपणे निघतो. शब्दाच्या अर्थामध्ये काहीच खोट नाही. काही शब्द असे असतात की, त्यातून एक ताकद ध्वनित होते. तसे ते राजपुत्रच ठरतात. अशा घराण्यात त्यांचा जन्म झाला ही काही त्यांची चूक नाही. परंतु नरेंद्र मोदी जेव्हा हा शब्द वापरतात किंवा त्याचा ज्या पध्दतीने उच्चारण करतात तो ऐकल्यावर 'शहजादे' म्हणून जन्माला येणे ही जणू घोडचूकच आहे. अशा तिरस्कृत पध्दतीने मोदी या शब्दाचा उच्चार करीत होते. राजकीय मतभेद व्यक्त करताना एखादा शब्द असा काहीसा कात्रीत सापडतो की, ज्यामुळे तो वापरणाऱ्याच्या विवेकाच्या बुध्दीचीही समाजात चर्चा होते. शब्द वापरताना त्यांच्या मनात राजकीय हेतू असणे स्वाभाविक आहे. परंतु या राजकीय हेतूबरोबर थोडे सामाजिक हित ठेवले तर ते जास्त उपयोगी पडू शकते. कारण भारतातले समाजकारणसुध्दा तितकेच महत्त्वाचे आहे आणि समाजकारणातूनच राजकारण जन्माला आले आहे. प्रदीर्घ काळ राजकारण करूनही आणि जगातल्या घडामोडींचे अवलोकन करूनही हे भान येत नसेल तर मात्र ते एक आश्चर्यच मानायला हवे.

## विकार आणि विखार

व्यावहारिक पातळीवर विचारांची देवाण-घेवाण करताना कठोरता येऊ शकते. विरोधाची धार तीव्र करण्यासाठीसुध्दा एखाद्या वेळेला शब्द सैल होऊ शकतात. असे असले तरी जिथे सातत्याने भाषणेच करावी लागतात, त्या ठिकाणी तशा प्रकारचा शब्दसंग्रहही असला पाहिजे आणि अशा शब्दसंग्रहासाठी तशाच वाचनाचा व्यासंगही असावा लागतो. दुर्दैवाने आपल्या देशात राजकारण्यांना वाचनाची आवड नाही. निदान गेल्या पंचवीस-तीस वर्षांत आलेली राजकारणातली पिढी वाचन न करणारी आणि म्हणूनच त्यांच्या केवळ बोलण्यातच नव्हे तर वागण्यातसुध्दा अनेक वेळेला अभिरूचीहीनता दिसून येते. अगदी संसद असो किंवा विधिमंडळ असो. अशा सार्वभौम सभागृहातसुध्दा चित्रविचित्र शब्द वापरले जातात आणि मग त्याला आक्षेप घेतला जातो. ते शब्द असंसदीय आहेत असे सभापतींना जाहीर करावे लागते आणि सभागृहाच्या नोंदीतून ते शब्द वगळले जातात. परंतु संसदीय आणि असंसदीय शब्दांची अशी विभागणी न करता संवेदनाशील आणि संवेदनाहीन अशीच त्याची वर्गवारी केली पाहिजे. आपण राजकारणात आहोत याचा अर्थ आपण काहीही बोललेले आणि काहीही केलेले चालते. विचारांना योग्य त्या विवेकाची जोड नसेल तर त्यातून चांगले व्यवहार होणारच नाहीत विकार आणि विखारच उत्पन्न होईल.